कोल्हापूर महानगरपालिका
राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM)
एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी.

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

# अटी/शर्ती

## राष्ट्रीय आरोग्य अभियान व १५ वित्त आयोगांतर्गत पालिक्लिनीक करीता विशेषज्ञ पदभरती जाहिगत सन २०२५-२६

कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान व १५ वित्त आयोगांतर्गत राबविणेत येणा-या विविध कार्यक्रमासाठी खालील तक्त्यातध्ये दर्शविलेप्रमाणे विशेषज्ञ यांची थेट मुलाखतीद्वारे निवड करणेत येणार आहे. खालील नमुद केलेली पदे कंत्राटी स्वरुपाची असून राष्ट्रीय आरोग्य अभियान व १५ वित्त आयोगांतर्गत धोरणानुसार पदाची नियुक्ती ही २९ जून २०२६ अखेर राहील.

| अ.क्र | कार्यक्रम | पद | शैक्षणिक आर्हता | रिक्त पदे | युपीएचसी/पॉलिक्लिनीक |
|---|---|---|---|---|---|
| | | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | | | |
| १ | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान | Paediatrician | MD Ped/DCH/DNB | ८ | फिरंगाई, पंचगंगा, कसबा बावडा, महाडिक माळ, आयसोलेशन, सदर बाजार, सिध्दार्थ नगर व मोरे माने नगर |
| | | Obstetrics and Gynaecologist | MD/MS Gyn/DGO/DNB | ८ | फिरंगाई, राजारामपूरी, महाडिक माळ, आयसोलेशन, फुलेवाडी सदर बाजार, सिध्दार्थ नगर व मोरे माने नगर |
| | | पॉलिक्लिनीक विशेषज्ञ | | | |
| २ | १५ वा वित्त आयोग अंतर्गत पॉलिक्लिनीक | Gynaecologist | MD/MS Gyn/DGO/DNB | १ | फुलेवाडी |
| | | Ophthalmologist | MS Ophthalmologist/ DOMS | १ | फुलेवाडी |
| | | Dermatologist | MD (Skin/VD), DVD, DNB | ४ | फिरंगाई, राजारामपूरी, महाडिक माळ व मोरे माने नगर |
| | | Psychiatrist | MD Psychiatrist/DPM /DNB | ५ | फिरंगाई, राजारामपूरी, महाडिक माळ, फुलेवाडी व मोरे माने नगर |
| | | ENT Specialist | MS ENT/DORL/DNB/ | ३ | महाडिक माळ, फुलेवाडी व मोरे माने नगर |

**महत्वाच्या सुचना-**

१. सदर पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणसंबंधी दावा करणेचा अधिकार राहणार नाही.

२. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी यांची प्रत्येक आठवडयास १ भेट याप्रमाणे प्रती भेट रु.२,०००/- इतके मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत.

३. १५ वित्त आयोगांतर्गत पॉलिक्लिनीक विशेषज्ञ Obstetrics and Gynaecologist, यांची प्रत्येक आठवडयास १ भेट Ophthalmologist, Dermatologist, Psychiatrist, ENT Specialist यांची प्रत्येक पंधरवडयातून एकदा प्रती भेटीस रु.२,०००/- तसेच प्रती रुग्ण रु.१००/- याप्रमाणे जास्तीत जास्त रु.५,०००/- पर्यंत मानधन असून याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत.

४. निवड झालेले उमेदवारांना दिनांक २९/६/२०२६ पर्यंतच्या कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. त्यापुढील कालावधीकरीता राज्य आरोग्य सोसायटी मुंबई यांचेकडून राष्ट्रीय आरोग्य अभियान व १५ वित्त आयोग सुरु ठेवणेस व पदांना मंजूर मिळालेनंतर तसेच मागील कालावधीतील काम समाधान असलेसच पुढील १ वर्ष कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल.



Scanned with CamScanner

५. पदांची संख्या शैक्षणिक आर्हता मानधन वयोमर्यादा तसेच अटी व शर्तीमध्ये गरजेप्रमाणे बदल करणेची शक्यता आहे. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार हे निवड समिती अध्यक्ष तथा आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

६. नियुक्त करणेत आलेल्या उमेदवारास अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार रु.५००/- चे स्टँप पेपरवर लिहून नोटरी करुन घ्यावा लागेल. करारपत्राचे अधिन नियुक्ती असेल.

७. विशेषज्ञ यांची सेवा प्रवेश व सेवा समाप्तीची वयोमर्यादा ७० वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारीरीकदृष्टया सक्षम असलेचे प्रमाणपत्र अर्जासोबत व कागदपत्र पडताळणीचेवेळी सादर करणे बंधनकारक राहील तसेच पुढील प्रत्येक पुनर्नियुक्तीचे वेळी सदर प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

८. शासन सेवेतून सेवा निवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी.

९. पात्र उमेदवार यांचे वर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेचे निदर्शनास आलेस झालेली नियुक्ती रद्द करणेत येईल.

१०. आर्हताधारक उमेदवारांनी खालील विहीत करणेत आलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावेत.

११. विशेषज्ञ या पदाकरीता दर सोमवारी थेट मुलाखत घेऊन भरणेत येणार आहे. या पदाचे अर्ज सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत श्री.पंचगंगा हॉस्पिटल, २ रा मजला एनयुएचएम ऑफिस येथे स्वीकरणेत येतील तसेच त्याच दिवशी दुपारी ३ वाजता मुलाखत घेऊन राबविणेत येईल. मुलाखतीचे वेळी मुळ प्रतीसह उपस्थित राहणेचे आहे. यामध्ये काही बदल झालेस महानगरपालिकेच्या (https://web.kolhapurcorporation.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेत येईल.

१२. विशेषज्ञ उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने निर्धारीत वेळेत उपस्थित राहणेचे आहे.

१३. विशेषज्ञ उमेदवारांनी या पदाकरीता अर्ज करणेपूर्वी उमदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अटी पूर्ण करतात याबाबत प्रथम खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच अर्ज करावेत.

१४. ज्या पदासाठी उमेदवारांनी अर्ज करावयाचा आहे त्या पदासाठी जाहिरातीमध्ये दर्शविलेले आर्हता अर्ज करतेवेळेस उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१५. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक पदाची किमान व कमाल वयोमर्यादा जाहिरात दिनांकास साक्षेप समजणेत येईल.

१६. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी चुकिची माहिती सादर केलेचे, कोणतीही माहिती दडवून ठेवलेचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केलेचे आढळून आलेस कोणत्याही टप्पयावर त्याची उमेदवारी, नियुक्ती पूर्वसुचना न देता रद्द करणेत येईल तसेच आवश्यक असलेस प्रशासकीय व फौजदारी कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१७. महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नमुना-अ या प्रपत्रात अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१८. उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या विहीत नमूयात संगणकीकृत अर्ज व आवश्यक सर्व कागदपत्राची साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात त्यामध्ये शैक्षणिक आर्हतेबाबतची कागदपत्रे, कौंसिलिंगकडे नुतनीकरण, जन्मदाखला, अनुभव प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र तसेच इतर अनुषंगिक कागदपत्र, पासपोर्ट आकाराचे दोन फोटो साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात.

१९. पात्रता अर्जाची स्वीकृती किंवा तो नाकारणे चुकिची माहिती दिल्याबद्दल शिक्षा व निवड पध्दती याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील याबाबत कोणतेही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

उपायुक्त-२
कोल्हापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner